**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग**
**<u>संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली</u>**

## जाहिराती विषयी अधिक माहिती

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील निसर्ग माहिती केंद्राकरीता एकूण ३ निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Nature Education & Extension Officer) यांची कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करणे प्रयोजित आहे. त्या करिता इच्छुक उमेदवार यांचे सीलबंद अर्ज उप संचालक (उत्तर) येऊर, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, यांचे नावे दिनांक १६/०७/२०२५ पासून ते दि. २२/०७/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उप संचालक (उत्तर) येऊर, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरीवली यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

**A) कामाचे स्वरुपः** -

१) नेचर ट्रेल/ ट्रेक साठी Naturalist (निसर्ग निर्वाचक) म्हणुन काम करणे.
२) निसर्ग माहिती केंद्र येथे आयोजित करावयाचे वर्षाचे Event Calendar तयार करणे व त्याचे नियोजन करणे.
३) निसर्ग माहिती केंद्र मधील आयोजित करण्यात येणारे विविध Events इत्यादीचे आयोजन करणे व ते कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडणे.
४) शाळा, महाविदयालये, कॉर्पोरेट ऑफिसेस यांचेशी संपर्क साधून जास्तीत जास्त व्यक्तीना निसर्ग माहिती केंद्राच्या उपक्रमांमध्ये सामील करणे व निसर्ग माहिती केंद्राच्या महसुलात वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे.
५) संजय गांधी राष्ट्रीय उदयानाची वेबसाईट, फेसबुक पेज इत्यादी अपडेट करणे व निसर्ग माहिती केंद्राचा ई-मेल हाताळणे व इतर संबंधित विषय.

**B) पात्रता**

१) अर्जदार विज्ञान शाखेचा मास्टर्स डिग्री धारक असावा. वनस्पती शास्त्र, प्राणीशास्त्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल.
२) अर्जदाराने निसर्ग निर्वाचक अथवा निसर्गप्रेमी संस्थेमध्ये काम केलेले असल्यास त्यास प्राधान्य दिले जाईल. अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.
३) संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे.
४) राष्ट्रीय उदयानाबद्दल सखोल माहिती असावी.
५) संजय गांधी राष्ट्रीय उदयानामार्फत आयोजित विविध संशोधन, संवर्धनात्मक कार्यक्रमामध्ये व निसर्ग शिक्षण विषयक कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला असल्यास त्यास प्राधान्य दिले जाईल
६) उत्कृष्ठ संभाषण कौशल्य असावे.

**C) मानधन:** प्रती माह रुपये ३५,०००/- (रु. पस्तिस हजार) सर्व भत्यांसह एकंदर मानधन अदा करण्यात येईल.

**D ) मुलाखत:** अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकि पात्र उमेदवार यांची मुलाखत वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उदयान बोरीवली यांचे कार्यालयात दिनांक २५/०७/२०२५ रोजी ११:०० वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. उमेदवारांची निवड मुख्यत्वे मुलाखतीच्या आधारावरच केली जाईल.

**E ) महत्वाची सुचना**

१) कोणतेही कारण न देता नेमणुक नाकारण्याचा पुर्ण अधिकार निवड समितीकडे राहिल त्याबाबत दाद मागता येणार नाही.
२) एखादया अर्जदाऱ्याच्या बाबतीत निकष शिथील करण्याचा अधिकार निवड समिती अध्यक्षांचा राहील.
३) निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी यांची निवड कंत्राटी पध्दतीने ११ महिने इतक्या कालावधीसाठी राहील. तथापि त्यांनी सदर कालावधीमध्ये उत्कृष्ठ काम केल्याचे कामाच्या मुल्यमापनाअंती स्पष्ट झाल्यास त्यांना प्रती वर्ष १०% पर्यन्त मानधन वाढ देवून मुदतवाढ देखील मिळू शकेल.

**F) अर्ज पाठविण्याचा पत्ता व ई-मेल आयडी**

१) अर्जदार हे खालील नमुद पत्त्यावर ऑफलाईन पध्दतीने लिफाफ्यामध्ये पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष हजर राहुन अर्ज सादर करु शकतात किंवा ऑनलाईन पध्दतीने ddnysgnp1@gmail.com या ई-मेल आयडीवर अर्ज सादर करु शकतात.
२) **कार्यालयाचा पत्ता -** उप संचालक (उत्तर) येऊर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालय, पोखरण रोड नं-१, उपवन ठाणे (पश्चिम) ४००६०६

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली**

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील निसर्ग माहिती केंद्राकरीता कंत्राटी पध्दतीने निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी नियुक्ती करीता जाहिरात

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील निसर्ग माहिती केंद्राकरीता एकूण ३ निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Nature Education & Extension Officer) यांची कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करणे प्रयोजित आहे. त्या करिता इच्छुक उमेदवार यांचे सीलबंद अर्ज उप संचालक (उत्तर) येऊर, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, यांचे नावे दिनांक १६/०७/२०२५ पासून ते दि. २२/०७/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उप संचालक (उत्तर) येऊर, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरीवली यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

| | |
|---|---|
| **पद** | **कंत्राटी-** निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Nature Education & Extension Officer) |
| **पदसंख्या** | ०३ |
| **मानधन** | रु. ३५,०००/- दरमहा सर्व भत्यांसह |
| **पात्रता** | १. अर्जदार विज्ञान शाखेचा मास्टर्स डिग्री धारक असावा, वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल.<br>२. राष्ट्रीय उद्यानाबद्दल व निसर्ग विषयक सखोल माहिती असावी.<br>३. उत्कृष्ट संभाष कौशल्य असावे.<br>४. संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे.<br>५. सदर क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य दिले जाईल. |
| **मुलाखत** | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालयात दि. २५/०७/२०२५ रोजी ११:०० वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. |

**टिप:-** ही शासकीय नोकरी नसून केंवळ कंत्राटी पध्दतीवर ११ महिन्यांच्या करारावर नियुक्ती आहे. सविस्तर तपशिल व अर्जाचा नमुना www.mahaforest.gov.in व www.sgnp.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशिल पाहून अर्ज करावे. आवश्यक वाटल्यास या विभागाशी संपर्क साधावा.

सही/-
उप संचालक (उत्तर) येऊर,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरीवली

**अर्जाचा नमुना**

उमेदवाराचा
फोटो

**प्रति,**

उप संचालक (उत्तर) येऊर
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

**विषय**:- संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील निसर्ग माहिती केंद्राकरीता एकूण ३ निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Nature Education & Extension Officer) यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करीता जाहिरात

**संदर्भ** :- वनविभागाच्या वेबसाईटवर / विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्डावरील प्रसिध्द झालेली जाहिरात.

**महोदय,**

मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळावरील तपशिलावर जाहिरात वाचली असुन, माझा वैयक्तीक तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नाव: -

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी: -

३. संपूर्ण पत्ता व मोबाईल / संपर्क क्रमांक / ईमेल आय.डी: -

४. शैक्षणिक पात्रता: -

५. अनुभव: -

शिक्षण व अनुभवाचे दस्ताऐवज या सोबत सहपत्रीत

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

ठिकाण: -
दिनांक: -